# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,हिंगोली

(गृह विभाग, कायदा व सुव्यवस्था)

E-mail ID :- rdc.hingoli123@gmail.com दुरध्वनी-02456 221450

वाचा- 1. साथरोग प्रतिबंध कायदा 1897 चे कलम 2, 3 व 4

2. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005.

3. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र.DMU/2020/CR-92/DISM -1, दि23.03.2020 व दि.25.03.2020दि.13.04.2020दि15.04.2020,.17.04.2020, दि.18.04.2020 व दि.02.05.2020

4.या कार्यालयाचे आदेश जा.क्र. 2020 /गो.शा-1/करोना/कावी दि.13/04/2020. दि.02/05/2020.

5. महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र.DMU/2020/CR-92/DISM -1 दि.17/05/2020.

---

**जा.क्र.2020/गो.शा.-1/ करोना /आदेश क्र. 127** दि.17/05/2020

**विषय:- करोना विषाणु (कोव्हीड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे बाबत (दि.18/05/2020 ते दि.31/05/2020 रोजी पर्यंत जिल्हयातील सिमा बंद बाबत.)**

**आदेश:-**

**ज्याअर्थी,**राज्य शासनाने करोना विषाणुचा (कोव्हीड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दिनांक 13/03/2020 पासुन लागु करुन खंड 2,3 व 4 मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे.त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कायक्षेत्रात (कोव्हीड19) नियंत्रणात आणण्यासाठी व त्यांच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्या करण्यासाठी सक्षम अधिकारी म्हणुन घोषीत करण्यात आलेले आहेत.

तथापी माझ्या असे निदर्शनास आले आहे की, हिंगोली जिल्हयातील नागरीक बाहेर जिल्हयात प्रवास करीत आहेत.तसेच बाहेर जिल्हयातील नागरीकही हिंगोली जिल्हयात येत आहेत.बाहेर जिल्हयातून येणारे नागरीक, प्रवासी यांचे मार्फत करोना विषाणुचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्याकरिता जिल्हयातील जनतेच्या आरोग्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने तात्काळ प्रतिबंधक उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्या नुसार संदर्भीय आदेश क्र.4 अन्वये हिंगोली जिल्हयाच्या सर्व सिमा दि.17/05/2020 पर्यंत बंद ठेवण्या बाबत आदेश निर्गमीत करण्यात आले होते. संदर्भीय क्र. 5 च्या आदेशान्वये महाराष्ट्र शासनाने लॉकडाऊनचा कालावधी दि.31/05/2020 पर्यंत वाढवलेला आहे.तसेच सद्दस्थितीतीत जिल्हयात करोना विषाणुच्या प्रादर्भावामुळे रुग्णाची संख्या वाढताना दिसुन येत आहे.

**त्याअर्थी,**मी रुचेश जयवंशी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, हिंगोली जिल्हयात करोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणुन नागरिकांमध्ये करोना विषाणुचा जिल्हयात संसर्ग व प्रादुर्भाव टाळण्यासाठी खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

1) हिंगोली जिल्हयाच्या सर्व सिमा दि.31/05/2020 पर्यंत बंद करण्यात येत आहेत.

2) जिल्हयातील कोणत्याही नागरीकास अत्यावश्यक कारण वगळता बाहेर जिल्हयात जाण्यास मनाई करण्यात येत आहे.

3)जिल्हयातील नागरीक नसलेल्या कोणत्याही व्यक्तीस जिल्हयात अत्यावश्यक कारणा शिवाय प्रवेश करण्यास मनाई करण्यात येत आहे.

4)पुणे-मुंबई व इतर महानगरातुन जिल्हयात आलेल्या व्यक्तींना वैदयकिय कारणाशिवाय घराबाहेर पडण्यास मनाई करीत आहे.

वरील आदेश शासकीय कर्तव्यावरील अधिकारी/कर्मचारी व अत्यावश्क सेवा यांचेसाठी लागु राहणार नाहीत.

सदरील आदेश **दि.18/05/2020 रोजी सकाळी 06.00 वा.पासून ते दि.31/05/2020 चे 24.00 वा** पर्यंत अंमलात राहतील आदेशाचे पालन न करणा-या कोणत्याही व्यक्ती, संस्था, अथवा समुह आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 अन्वये आणि भारतीय दंड संहिता 1860 मधील कलम 188 नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व कार्यवाही करण्यात येईल.

स्वा/-
**(रुचेश जयवंशी)**
**जिल्हादंडाधिकारी हिंगोली.**

**प्रतिलीपी, माहीती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.**

1.मा.प्रधान सचिव ,महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग मुंबई यांना माहितीस्तव.
2.मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहितीस्तव.
3.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद हिंगोली.
4.पोलिस अधिक्षक, हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
5.उप प्रादेशीक परिवहन अधिकारी ,हिंगोली.
6.उपविभागीय दंडाधिकारी,हिंगोली/कळमनुरी/वसमत.
7.तालूका कार्यकारी दंडाधिकारी,हिंगोली/कळमनुरी/वसमत/औंढा/सेनगांव
8.जिल्हा माहिती अधिकारी, हिंगोली.

**(रुचेश जयवंशी)**
**जिल्हादंडाधिकारी हिंगोली.**

Scanned by CamScanner